डॉ. शिवाजी ईश्वरराव नेळगे, वैद्यकीय अधिकारी,
<u>गट-अ यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्तीबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः स्वेसेनि-२०१७/प्र.क्र.२३१/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा. मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: २१ एप्रिल, २०१८

वाचा :- १) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/२ब/डॉ. नेळगे/स्वेसेनि/टे.क्र.५/२ब/४९८/१७, दि.२५/०४/२०१७.
२) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी मूळ अर्ज क्र.६०७/२०१७ च्या अनुषंगाने दि.२३.०३.२०१८ रोजी परित केलेले आदेश.

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील (वेतन बँड रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४००) या मध्ये कार्यरत असलेले डॉ. शिवाजी ईश्वरराव नेळगे, वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, तळेगाव (टा.), जि. वर्धा यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस होऊन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.२०.०४.१९८८ अन्वये नियमीत नियुक्ती झाली आहे. डॉ. नेळगे, यांची म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम क्र. ६६ (१) मधील तरतुदीनुसार, त्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून पुढे २० वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण झालेली असल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (५) नुसार डॉ. नेळगे यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस विहित कालावधीत मागे न घेतल्याने, म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (२) नुसार डॉ. नेळगे हे आपोआपच स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या नोटीशीच्या समाप्तीच्या दिनांकास स्वेच्छा सेवानिवृत्त (Deemed to retire) झाले आहेत. सबब, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६६ (१) (२)

(५) मधील तरतुदीनुसार तसेच, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी मूळ अर्ज क्र.६०७/२०१७ मध्ये दि.२३.०३.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशास अनुसरुन डॉ. शिवाजी ईश्वरराव नेळगे, वैद्यकिय अधिकारी, गट-अ, हे दि.०६/०२/२०१७ (म.पू.) पासून स्वेच्छेने सेवानिवृत्त झाले असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१०१५५३२५५४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2018.04.21 17:07:37 +05'30'

(व. मुं. भरोसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर.
४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा.
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखारीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, वर्धा.
७) डॉ. शिवाजी ईश्वरराव नेळगे, वैद्यकिय अधिकारी यांना
(उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ. नागपूर यांचे मार्फत)
८) निवडनस्ती सेवा-३.